# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ३३ वा ❑ बुधवार दि.०५ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## पत्नी पिढीत पुरुषांच्या व्यथा समजून घेताना...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

अलीकडे कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे मोठ्या प्रमाणात वाढत असून न्यायालयात या विसंवादाच्या प्रकरणांची मोठी खच पडलेली आहे. पती–पत्नी विसंवादात पतीकडून पत्नीवर अत्याचार होतो हे सत्य स्वीकारत असतानाच या हिंसाचारातील दुसरी बाजू देखील तपासून बघणे आवश्यक आहे. पत्नीकडून होणाऱ्या पतीच्या छळाची प्रकरणे मात्र पुढे येताना दिसत नाहीत. याचा अर्थ तसे होतच नसावे असे समजता येऊ नये. एकेरी बाजूचे नाणे असू शकत नाही, तशातला हा प्रकार ; म्हणूनच पारंपरिक किंवा रूढ समजाच्या पलीकडील दुसऱ्या बाजूचाही विचार गांभीर्याने होणे गरजेचे बनले आहे. कारण, आता तशा घटनाही वाढू लागलेल्या दिसत आहेत.

सासरच्या किंवा पतीच्या छळाला कंटाळून पत्नीने आत्महत्या केल्याच्या बातम्या आपण रोजच वाचत असतो. यात तथ्य मोठ्या प्रमाणात असते. हे कटू सत्य स्वीकारत असताना दुसरी बाजुचा देखील विचार होणे आवश्यक आहे. अलीकडे पत्नी पीडितांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून पत्नी पिढीतांच्या संघटना देखील स्थापन झालेल्या आहेत. अधिकाधिक संरक्षण स्त्रियांना आहे.स्त्रियांच्या संरक्षणासाठी अनेक तरतुदी घटनेत आहे. तुलनेने पुरुषांसाठी कायदे कमी आहेत.

पती पत्नी हिंसाचार प्रकरणांमध्ये कायद्याचा होणारा गैरवापर वाढू पाहत असून, भलेही अपवादात्मक असेल, परंतु पत्नीकडून होणाऱ्या पतीच्या छळाकडे दुर्लक्षच घडून येते. अशा प्रकरणांमध्ये पुरुष एकाकी पडताना दिसून येतात व अंतिमतः मनाने कमजोर असलेले आत्महत्येकडे वळतात, म्हणून या विषयाकडे समाजशास्त्रींनी गांभीर्याने लक्ष पुरविणे गरजेचे बनले आहे.

नागपूर मध्ये एका डॉक्टरने पत्नी व सासरच्या लोकांना कंटाळून स्वतःला भुलचे इंजेक्शन लावून घेत स्वतःला संपविले. नांदेड मध्ये देखील एका प्राध्यापकाने पत्नी व सासरच्या मंडळींच्या त्रासाला कंटाळून टोकाचं पाऊलं उचलत आत्महत्या केली.

अशा अनेक घटना आपल्या अवतीभवती घडत असून पत्नी पीडितांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पत्नी पीडित पुरुषांची व्यथा जेव्हा मी वर्तमान पत्रातून मांडली तेव्हा अनेकांचे फोन मला आले. त्यात यवतमाळ जिल्ह्यातील एका दाम्पत्यांनी आपल्या मुलावर पत्नीकडून होत असलेल्या अत्याराचा पाढा वाचला. माझा मुलगा विदेशात असून त्याने इंजिनिअरिंगची पदवी घेतली असून पुढं त्याच विवाह रितिरिवाजा प्रमाणे करून देण्यात आले. मुलगा व सून आठ वर्षे विदेशात वास्तव्याला होते. त्यांना एक मुलगा देखील झाला. मध्यंतरी आमची सून माहेरी आली.तिच्या वागण्यात बोलण्यात बराच बदल आम्हाला जाणला.मुलाने तिला यायला सांगितले, कॉल केले परंतु तिने येण्यास नकार दिला.काही दिवसानंतर तिने आंम्हाला वकिलांमार्फत नोटीस पाठवून आम्हा तिघांवर कौटुंबिक हिंसाचार केल्याची खोटी केस दाखल करून चाळीस लाख रुपयांची मागणी केली. मुलगा विदेशात असून त्याला केसवर व आम्हाला अधूनमधून कोर्टात जावं लागतं. हा आमच्यावर झालेला अन्याय असून काही कारण नसताना आम्हाला गोवण्यात आलं..

खरे तर कायदा कोणताच वाईट नसतो, तो उदात्त हेतूनेच बनवला गेलेला असतो. परंतु, त्याचा गैरवापर करणारे करतात. छळाच्या प्रकरणांमध्ये तेच अधिकतर होताना दिसते. विशेष म्हणजे पुरुषांसाठी वेगळे कायदे नाहीत. स्त्रियांसाठी म्हणजे त्यातही पत्नी व सुनेसाठी कायदे आहेत, परंतु स्त्रियांमधील सासू, जाऊ, नणंद किंवा पुरुषांमधील पती, सासरे, दीर या व्यक्तिरेखांसाठी म्हणून कायद्यात वेगळ्या तरतुदी नाहीत. त्यामुळेच पुरुष आयोग हवा अशी मागणी लावून धरली जात आहे. पत्नीवर छळ होतो हे सत्य स्वीकारत असतानाच पुरुषांवरील होणाऱ्या छळाकडे दुर्लक्ष होता कामा नये.पत्नी पिढीत पुरुषांच्या व्यथा देखील समजून घेण्याची गरज आहे.

# महिला व बाल विकास विभाग 'बालस्नेही पुरस्कार २०२४' चे वितरण

## राज्य बाल हक्क संरक्षण आयोग अधिक सक्षम करणार–महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – बालकांना सुरक्षित, सक्षम आणि विकसित करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी केले. राज्य बालहक्क संरक्षण आयोग अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. बाल संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी आणि यंत्रणांचा सन्मान करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्यावतीने 'बालस्नेही पुरस्कार २०२४' समारंभाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार संजय केळकर, आमदार मनीषा कायंदे, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग पोलीस अपर महासंचालक अश्वती दोर्जे, आयोगाचे माजी आयुक्त प्रशांत नारनवरे, आयोगाचे सचिव लक्ष्मण राऊत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

अवर सचिव वंदना जैन, शिक्षण अधिकारी माधुरी भोसले, सदस्य नीलिमा चव्हाण, जयश्री पालवे, सायली पालखेडकर, संजय सिंगल, चैतन्य पुरंदरे, आदिसह जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त, पोलीस अधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

आयोगाच्या अध्यक्ष सुशीबेन शाह म्हणाल्या की, महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी पारदर्शक यंत्रणा असण्यावर भर देण्यात येत आहे. बालकांच्या हक्काबद्दल माहिती देणे आणि त्यांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी चिराग ॲप विकसित करण्यात आले असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहायाने मुलांना सुरक्षित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे अध्यक्ष शाह यांनी सांगितले. यासंदर्भातील जनजागृतीसाठी



आवश्यक भित्तिपत्रिकेचे व मुलांच्या काळजी आणि संरक्षण नियमावलीत केलेल्या सुधारणा पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. महिला व बालविकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, आयोगाने अनावरण केलेले भित्तीपत्रक हे सर्व पोलीस स्थानकात लावण्यात येणार असून त्यावर असलेल्या क्यू–आर कोडमुळे बाल हक्क व संरक्षण आयोगाची सर्वांना माहिती मिळणार आहे.

बालकाच्या जन्मापासून ते १८ वर्ष होईपर्यंत शिक्षण, आरोग्य, संरक्षण, मूलभूत अधिकार त्यांना देण्याचे काम आयोग करीत आहे. आयोग अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करत आहे. महिला आणि बालकांच्या सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत असल्याचेही महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी सांगितले. बालकांसाठी आयोगाच्या विविध उपक्रमात आपला सक्रिय सहभाग व मौलिक योगदानाबाबत खासगी स्वयंसेवी संस्था यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट जिल्हाधिकारी, उत्कृष्ट विशेषगृह, उत्कृष्ट स्वयंप्रेरणेने सुरक्षिततेसाठी राबविलेले उपक्रम, उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी, उत्कृष्ट विशेष दत्तक एजन्सी, पोलीस अधीक्षक, उत्कृष्ट पथदर्शी व प्रेरक व्यक्तिमत्व, सहायक पोलीस आयुक्त, उत्कृष्ट जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, उत्कृष्ट जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, पोलीस उपनिरीक्षक, उत्कृष्ट जिल्हा बाल संरक्षण कक्ष, सहाय्यक पोलीस निरीक्षक, उत्कृष्ट बाल कल्याण समिती, पोलीस हवालदार, उत्कृष्ट बालगृह, पोलीस शिपाई, बालस्नेही पुरस्कार, पोलीस अंमलदार, उत्कृष्ट परिविक्षा अधिकारी, उत्कृष्ट खुले निवारा गृह, उत्कृष्ट काळजी वाहक, उत्कृष्ट समुपदेशक, उत्कृष्ट विभागीय उपायुक्त यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# श्रीयश तंत्रनिकेतनचे वार्षिक स्नेहसंमेलन "ऐक्यम" उत्साहात संपन्न

## प्रादेशिक थीम चे बहारदार सादरीकरण

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.प्रत्येक विभागाने भारतातील वेगवेगळ्या राज्यांची प्रादेशिक थीम रंगमंचावर सादर केली, विद्यार्थ्यांच्या सुरेल आवाजाने प्रेक्षकांची मने जिंकली,बहारदार नृत्याचे सादरीकरण करतानी विद्यार्थी प्रेक्षकही नृत्यावर थिरकले, तसेच फॅशन शोचे सादरीकरण अप्रतिम झाले.

वार्षिक स्नेहसंमेलनाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली प्रमुख पाहुणे लेखक, व्याख्याते प्रा.विशाल गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना छत्रपती शिवरायांचे विचार मांडत प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवल्या.प्राचार्य संदीप खंडागळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचा समारोप बक्षीस वितरणाने झाला यावेळी श्रीयश प्रतिष्ठान चे अध्यक्ष इंजि.बसवराज मंगरुळे यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले व सर्वत्कृष्ट सादरीकरणाचे बक्षीस वितरण केले

प्रथम उत्कृष्ट प्रादेशिक थीम : महाराष्ट्रीय (कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग), प्रथम उत्कृष्ट गायन : संस्कृती मगरे, प्रथम उत्कृष्ट नृत्य: ओल्ड इज गोल्ड (तृतीय वर्ष संगणक विभाग ) तसेच फॅशन शोचेही बक्षीस वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाचे परीक्षण नाट्यकलावंत जयेश निरपळ यांनी अभिनयातील बारकावे सांगताना कलावंतांनी सादरीकरणात कुठल्या गोष्टी टाळाव्या हे ही विद्यार्थ्यांना सांगितले . इलेक्ट्रॉनिक विभागाने सादर केलेल्या बंगाली थीमने प्रेक्षकांची मने जिंकली व महाराष्ट्रीयन थीममध्ये छत्रपती शिवराय व अफजल खान युद्धाचा प्रसंग प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडणारा होता, संपूर्ण नाट्यगृहात शिवरायांच्या घोषणा आणि टाळ्यांचा




जयघोष होता. यावेळी स्नेहसंमेलन समन्वयक प्राध्यापकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. सर्व विभागप्रमुख व विद्यार्थी कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## लक्षवेधी छायाचित्र....



दर्शन संस्कृतीचे......

(छाया : भीमराज सातदिवे, छत्रपती संभाजीनगर)

# ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ स्वर्णलताताई भिशीकर : दुःखद निधन!

ज्योतिर्मय साहित्य

**सोलापूर** – ज्ञान प्रबोधिनी सोलापूर हराळीच्या प्रमुख विश्वस्त, ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ स्वर्णलताताई भिशीकर (वय ७४)ह्यांचे प्रदीर्घ आजाराने सोलापूर येथे काल रात्री दुःखद निधन झाले आहे. आज मंगळवार ४ मार्च रोजी सकाळी दहा वाजता मोदी स्मशानभूमी येथे त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले तत्पूर्वी त्यांचा पार्थिव रेल्वे लाईन भागातील ज्ञान प्रबोधिनी प्रशाला च् सभागृहात

अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आला होता सोलापुरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डॉक्टर लता ताई यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले

डॉ लताताई मूळच्या पुणे येथील, प्रख्यात संपादक कै.चं.प. तथा बापूसाहेब भिशीकर ह्यांच्या कन्या, सोलापूर येथील केळकर दांपत्याने बालविकास मंदिर शाळा, ज्ञान प्रबोधिनीकडे हस्तांतरित केल्यावर त्या सोलापूरला स्थायिक झाल्या. ज्ञान प्रबोधिनी पुणेचे संस्थापक कर्मयोगी अप्पासाहेब पेंडसे ह्यांची जीवन मूल्ये त्यांनी तरुण वयात आत्मसात केली होती. पुढे शिक्षण तज्ञ कै.व.सी. तथा अण्णासाहेब ताम्हणकर ह्यांच्या नेतृत्वात त्यांनी ज्ञान प्रबोधिनीचे आजीवन कार्य करण्याचे व्रत निभावले. सोलापूर आणि हराळी येथे भव्य वास्तूंची निर्मिती आणि उत्तम संस्कार संपन्न तरुण पिढी घडविण्यात त्यांचे अतुलनीय योगदान राहिले आहे. शिस्तबद्ध गणेश विसर्जन मिरवणूकीची आदर्श प्रथा त्यांनी सोलापूरात यशस्वी करून दाखवली.

सोलापूरला आल्यावर त्यांनी प्रबोधिनीत सत्संग केंद्राची स्थापना केली. स्वरूप संप्रदायाचे स्वामी माधवनाथ ह्यांचा अनुग्रह त्यांना प्राप्त झाला होता. कर्तव्याशी बांधील राहून खरा परमार्थ कसा करावा ह्याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी आचरणात आणला आणि ज्ञानेश्वरी, दासबोध, पतंजली योगसूत्रे ह्यांचेद्वारे नेमके मार्गदर्शन त्या साधकांना करीत असत. पुण्याचे डॉ माधवराव नगरकर तथा स्वामी माधवानंद ह्यांचे प्रमुख उपस्थितीत सत्संग शिबिरे, गुरू पौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात लताताईचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी लिहिलेली पुस्तके,विविध इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे त्यांच्या विद्वत्तेचे प्रगल्भ दर्शन घडवतात.दिवंगत श्रेष्ठ संत विमलाजी ठकार ह्यांच्या प्रेरणेने मागील



आठ दहा वर्षात दोन तीन वेळा त्यांनी संपूर्ण वर्षभर एकांतात अज्ञात स्थळी राहून मौनव्रत स्वीकारून ध्यान सेवा साधना केली होती.वंदनीय वै. भाऊ थावरे त्यांना ''योगिनी'' असे संबोधित असत, अशीच त्यांची सिद्धता होती! त्यांच्या जाण्याने आध्यात्मिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## उपासनेचा काळाशी जवळचा संबंध

ज्योतिर्मय साहित्य


सद्य:स्थितीत त्या सर्वच बाबी काळाच्या ओघात बदलल्या आहेत. वेळ हा आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या सर्व गोष्टींशी निगडीत असतो, म्हणून आपण अनेकदा वेळेच्या परिमाणाबद्दल ऐकतो.वेळ हा जीवनाचा एक आवश्यक आणि अविभाज्य घटक आहे.

वाढदिवस, वर्धापनदिन आणि बाळांचा जन्म यासह अनेक बाबतीत वेळ विशेष टप्पे दर्शवते आणि आपल्याला आपले दैनंदिन जीवन तसेच क्रियाकलाप आयोजित करण्यात मदत करते.जेणेकरून आपण अधिक संघटित, उत्पादक आणि आनंदी जीवन जगू शकतो. सूर्यास्तापासून रात्रीपर्यंत, भरती-ओहोटी, चार ऋतू सर्व काही वेळेवर अवलंबून असते. मानवी जीवन वेळेनुसार मोजले जातेआणि सूर्य, चंद्र तसेच पृथ्वीचे चक्र हेच मुळी वेळ म्हणून ओळखले जाते. काळाव्दारे आपल्याला वर्ष, महिना, आठवडा, दिवस, तास, मिनिट, सेकंद आणि त्यातील काही भाग कळतात. प्रत्येक वेळी आपल्याला वस्तूंच्या गतीची गणना करण्यासाठी त्याची काहीना काही मदतच होते. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा इतिहास आपल्याला कळतो आणि या घटनांचे दस्तऐवजीकरण करण्यात आपल्याला मदत होते. विशिष्ट घटनेची वेळ ठरवण्यासाठी इतिहासकार वेळेवर अवलंबून असतात. पुरातन वास्तू आणि कलाकृतींचे वय ठरवण्यासाठी वेळ देखील महत्त्वाचा आहे. जितका वेळ आणि वेळ अप्रचलित असेल तितका तो अधिक मौल्यवान आणि अधिक महाग आहे. आपल्याला उपासनेची कृत्ये माहीत आहेत, विशेषत: प्रार्थना, जी देवावर विश्वास ठेवणाऱ्या साधकांसाठी महत्वाची समजली जाते, ती विलंब न करता ठरलेल्या वेळी केली जाते. त्याचप्रमाणे, सर्व उपासनेचा काळाशी जवळचा संबंध असल्याचे आपल्याला आढळते.ह्याचाच अर्थ, प्रत्येक व्यक्तीला वेळेचे भान राखणे आवश्यक असते. अनेकदा असे दिसून येते कि, काळ आपल्याला सांगून येत नाही आणि वेळा आपल्याला पाळता येत नाहीत.

## पुलंचे एक अप्रतिम व्यक्तीचित्र – विनोद दा

ज्योतिर्मय साहित्य

उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

पुलंच्या सिद्धहस्त लेखणीतून जे जे काही कागदावर उतरले, ते ते अजरामर झाले असेच म्हणावे लागेल. पुलंच्या अनेक व्यक्तीचित्रांशी आपण परिचित असतो. नारायण, हरीतात्या, सखाराम गटणे, अण्णा वडगावकर, चितळे मास्तर, नामू परिट यासारख्या त्यांच्या अनेक व्यक्तीचित्रांशी मराठी माणसाचे हृदयाचे नाते जुळले आहे. ही माणसे आपल्याला आपल्यातीलच एक वाटतात. हे त्यांचे शब्दचित्र रेखाटतानाचे कौशल्य आहे. त्या कथा वाचताना किंवा पुलंच्या तोंडून ऐकताना, ती माणसे अक्षरशः जिवंत होतात आणि आपल्या मनात कायमचे स्थान पटकावतात. पुलंच्या सिद्धहस्त लेखणीचा परिसस्पर्श ज्या ज्या विषयांना झाला, त्यांचे सोने झाले. त्यांचे असेच एक फारसे परिचित नसलेले व्यक्तीचित्र आज आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करतो आहे.


हे व्यक्तिचित्र आहे विनोद दांचे. वंगचित्रे हे त्यांचे पुस्तक वाचत असताना हे विनोद दा आपल्याला भेटतात आणि कायमचे आपल्या हृदयात स्थान मिळवतात. आपल्याकडे आपण आपल्यापेक्षा वयाने जेष्ठ असलेल्या व्यक्तीला दादा असे सर्वसाधारणपणे म्हणतो. परंतु बंगालमध्ये साधारणपणे दा असे म्हणण्याचा प्रघात आहे. दा शब्दच कानाला किती गोड लागतो !



वयाची पन्नाशी उलटल्यानंतर पु ल देशपांडे १९७० मध्ये शांतिनिकेतनला गेले. तिथे अनेक दिवस राहिले आणि बंगाली भाषा त्यांनी उत्तम प्रकारे आत्मसात केली. रवींद्रनाथ टागोरांच्या गीतांजली चा अनुवाद करणारे वामन मंगेश दुभाषी उर्फ ऋग्वेदी हे पुलंचे आजोळचे आजोबा. त्यांच्याकडूनच रवींद्रनाथ टागोरांचे साहित्य आणि बंगाली भाषेची आवड पुलंकडे आली. कोणतीही भाषा शिकायची तर ती जिथे बोलली जात असते तिथे जाऊन अनुभवावी, तिच्या विविध रूपांचा आस्वाद घ्यावा आणि त्यातून ती शिकावी अशी त्यांची धारणा होती. त्याप्रमाणेच पुलं शांतिनिकेतनात राहिले. ते कोलकात्यासारख्या शहरात राहिले तसेच बंगालमधील खेड्यापाड्यांमधूनही हिंडले. त्यातूनच त्यांचे वंगचित्रे हे पुस्तक साकार झाले आहे. या पुस्तकातीलच एक प्रसंग आणि हे एक व्यक्तीचित्र आहे.

आपल्या शांतिनिकेतनमधील वास्तव्यात पुलंनी तिथली भाषा, संस्कृती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. एखाद्या ठिकाणी काही दिवस वास्तव्य केल्याशिवाय तेथील संस्कृती खऱ्या अर्थाने कळत नाही. पुलंनी शांतिनिकेतनमध्ये बराच काळ वास्तव्य केले. त्यातूनच त्यांची मुक्काम शांतिनिकेतन आणि वंगचित्रे ही पुस्तके जन्माला आली. अशाच एका प्रसंगी ते शांतीनिकेतनमध्ये हिंडत असताना कलाभवनातल्या बंगलीवजा वसतिगृहातल्या छतावर त्यांनी सुंदर म्युरल्स पाहिली. ती पाहिल्यानंतर त्यांच्याबरोबर असलेल्या सलील यांना त्यांनी त्याबद्दल विचारले. तेव्हा सलील यांनी ती म्युरल्स विनोद – दांनी काढली असे सांगितले. त्या उत्सुकतेपोटी पुलं आणि सलील विनोद दा यांना भेटायला गेले आणि मग त्या प्रसंगाचे सजीव चित्रणच पुलं यांनी केले आहे. तो प्रसंग आणि ती व्यक्ती आपल्या डोळ्यासमोर उभे करण्याची ताकद पुलंच्या शब्दांमध्ये आहे.

विनोद दा ज्या वातावरणात बसले होते, त्याचं हे बोलकं चित्रण त्यांच्याच शब्दात...! **(क्रमश:)**



दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सत्वगुण लक्षण (समास सातवा)

ज्योतिर्मय साहित्य

श्री गणेशाय नमो नम:

श्री शारदा मातेला वंदन करून सत्वगुण लक्षणांचा अभ्यास करूया.


देहाभोवती केंद्रित झालेले जीवन म्हणजे प्रपंच आणि आत्मबुध्दीचे किंवा देवाभोवती। केंद्रीत झालेले जीवन म्हणजे परमार्थ होय. त्रिगुणांचे प्रापंचीक रूप शबल असते तर पारमार्थिक रूप शुद्ध असते. समर्थांनी एकुण ८८ ओव्या मध्ये सत्वगुण लक्षण सांगितले आहेत. खरं तर संपूर्ण दासबोध ग्रंथच सत्वगुणी लक्षणांनी भरलेला आहे. कसं जगावं जगात कोणकोणत्या प्रकारची माणसं आहेत हे फार विस्तृत विवेचन आहे. पण जेव्हा डावी बाजू मांडली जाते तेव्हाच ऊजव्या बाजूची किंमत कळते. म्हणजेच वाईट गुण सोडल्या शिवाय चांगल्या गुणांची किंमत कळत नाही. म्हणून मागील दोन समासात आपण मानवी देहाने कसे असु नये ह्याचा अभ्यास केला खरं तर ईश्वरावर प्रेम, विवेकीवर्तन, परमार्थाची आवड हरीकथेची गोडी ही सत्व गुणांची लक्षणे आहेत. आता याचा विस्तृत मागोवा घेऊया.

अज्ञान अंधकाराचा शेवट करून परमानंद देणारा हा सत्वगुण परमार्थाचे अनाकलनीय सौदर्य आहे. मानवी देहात सत्वगुण तसा दुर्लभच म्हणून तर

रामकृष्ण अवतारात आणि आता ऐकविसाव्या शतकात, २०-२१ सालात करोनारुपी दुष्ट राक्षसासी सारं जग झगडत आहे.

भजन पूजनाला सत्वगुणाचा आधार लागतो संसारामध्ये दु:खाचे मुळ जे आहे ते परमार्थ करून सत्वगुणांचा वापर केला तर माणसाला दु:ख रहाणारच नाही. सत्वगुणाने देहाला ऊत्तम गती मिळते. भगवंताचे दर्शन होऊन सायुज्यमुक्ती मिळते. सत्वगुण हा भक्तांना आधार आहे. भक्त जीवनरूपी भवसागर तरून जातो मोक्षरूपी लक्ष्मीचे ऐश्वर्य मुक्त पुरूशाच्या वागण्यात दिसते.

**(क्रमश:)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## कर्तेपणाचा अभिमान नसावा

ज्योतिर्मय साहित्य

विषयात राहून परमात्म्याची भक्ती होईल का ? विषय सोडल्याशिवाय 'मी भक्ती करतो' असे म्हणणे चुकीचे आहे. विषय आहेत तिथे भक्ती नाही, आणि भक्ती आहे तिथे विषय नाहीत. भक्त म्हणजे भगवंताचे होऊन राहणे. त्याला शरण गेल्याशिवाय त्याचे होताच येत नाही. अभिमान ठेवून आपल्याला कधीच भक्त होता येत नाही. प्रथम अभिमान कसा नाहीसा होईल ते पाहावे, आणि तसे वागण्याचा प्रयत्न करावा. आपण प्रपंचात 'मी करीन तसे होईल' या भावनेने वागत असतो. परवाच एकजण आले होते, त्यांना त्या वेळी पाहून कोणीही म्हटले असते की, हे थोड्याच दिवसांचे सोबती आहेत. तरीही ''मी अमुक करीन, मी तमुक करीन,'' असे ते म्हणतच होते; आयुष्याच्या शेवटच्या घटकेलाही केवढा तो अभिमान ! म्हणून सांगतो की, 'मी करतो' ही भावना टाकून देऊन, सर्व काही तोच करीत आहे, आणि त्याची इच्छा असेल तोपर्यंत आपल्याकडून तो करवून घेत असतो, ही भावना ठेवून वागावे. त्याप्रमाणे वागू लागले म्हणजे आपोआपच विषयाची आसक्ती कमी होऊ लागते. 'मी कर्ता आहे' ही भावना गेल्याशिवाय परमार्थ करता येणे शक्यच नाही.

कोणतेही कर्म केले म्हणजे अमुक एक फळ मिळेल म्हणून वेदांत सांगितले आहे, त्यावरून, वेद हे विषयासक्ती वाढवतात असे काहीजण म्हणतात. पण वडील माणसे जसे औषध देताना गुळाचा खडा दाखवितात त्याप्रमाणे ते आहे. माणसाने फळाच्या आशेने तरी कर्म करायला लागावे. तो कर्म करू लागला म्हणजे आपोआपच फळावरची त्याची आसक्ती कमी होत जाते; आणि पुढे अभिमान जाऊन, मी कर्ता नसून तोच करवीत आहे असे वाटू लागते. मग तो जे कर्म करील ते देवाला आपोआप अर्पण होते. संकट आले म्हणजे आपण देवाला नवस करतो, देवाने मनासारखे दिले नाही म्हणजे 'देवात अर्थ नाही' असे म्हणतो. पण देवाला फसविणे शक्य आहे का ? तो म्हणतो, 'हा सुखात असताना माझी आठवणही काढीत नव्हता, आणि आता आठवण करतो आहे !' वास्तविक देवाने आपल्याला पावावे असे आपण काय केले आहे ? म्हणून केव्हाही देवाला फसवू नये; कारण देव फसला न जाता आपलीच फसगत होते. आपण प्रपंचासाठी रोज इतके काबाडकष्ट करतो, परंतु दिवसातून एखादा तास तरी देवाकरिता खर्च करतो का हे आपल्याशीच विचार करून पाहावे.

जोपर्यन्त विषयाची आस । तोपर्यन्त नव्हे भगवंताचे दास ।।

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## देण्याचा व घेण्याचा दिवस

ज्योतिर्मय साहित्य

थोडक्यात आपण पैसे ठेवले आहेत हे विसरुन जायचे.आणि नोटा ठेवताना मनात एकच भावना ठेवायची ती म्हणजे *ही नोट ज्याला मिळणार आहे, त्याचे कल्याण व्हावे व त्याला आनंद मिळावा.

यात देणारा व घेणारा दोघेही एकमेकांना ओळखत नसतात.यातून काय साध्य होईल ? तर आनंद आपल्याकडे येईल.कारण त्या प्रत्येक नोटे बरोबर आपण आनंदाचे दान केले आहे. आणि निसर्ग नियमा नुसार एकाचे अनेक पण आपल्याकडे येतात.त्यामुळे अनेक पटीने आनंद आपल्याकडे येणार आहे. अनुभव घेऊन तर बघू या.

जी गोष्ट देण्याची तिच गोष्ट घेण्याची.आपण शक्यतो काही घ्यायला नको म्हणतो. अगदी कोणी नमस्कार करु लागले तरी नाकारतो.तसे करु नये. छान नमस्कार घ्यावा व तोंड भरून सदिच्छांचा आशीर्वाद द्यावा.कोणी काहीही दिले तरी ते तितक्याच चांगल्या मनाने स्वीकारावे.व चांगल्या शुभेच्छा द्याव्यात,धन्यवाद द्यावेत. आपल्याला जर रस्त्यात बेवारस काही वस्तू,पैसे सापडले तर आपण आधी कोणाचे आहे याचा शोध घेतो.जर कोणी आसपास नसेल तर लगेच असा विचार करतो की हे कोणाला तरी देऊन टाकू, पैसे असतील तर दानपेटीत टाकण्याचा विचार येतो. त्या पेक्षा त्या वस्तू/पैसे जवळ ठेवावेत आणि ज्याचे असेल त्याला सुखी व आनंदी ठेवा असे म्हणावे.

हेच ते देण्याचे व घेण्याचे नियम ! हे अमलात कसे आणायचे याची कृती बघू.

आज भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला काहीतरी भेट देईन.

जे मिळेल त्याचा मनापासून व आनंदाने स्वीकार करेन.

आज कोणाच्या विषयी किंतू ठेवणार नाही.

आज भेटणाऱ्या प्रत्येका विषयी काळजी,सहानुभूती,सहृदयता बाळगेन व तसेच वर्तन करेन.

आज सगळ्यांशी हसून,मार्दवतेने वागेन.

आज सगळ्यांशी प्रेमाने वागेन.

असा आठवड्यातून एक दिवस ठेवायचा.आणि येणाऱ्या आनंदाला व भरभराटीला समोरे जाऊन स्वीकार करायचा.

तुम्ही हे नक्की आनंदाने करणार!



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**कुसुमस्तबकस्येव द्वयी वृत्तिर्मनस्विनः ।**
**मूर्ध्नि वा सर्वलोकस्य विशीर्येत वनेऽथवा ।।**

अर्थ – पुष्पस्तबकाप्रमाणे स्वाभिमानी व्यक्तीची वृत्ती दोन प्रकारची असते. एक तर त्याला लोक डोक्यावर घेतात अर्थात त्याचा सन्मान करतात, अथवा वनांतरीच तो शीर्णतेला प्राप्त होतो.

स्वाभिमानी व्यक्ती कोणाच्याही पुढे पुढे करीत नाही. त्यामुळे एक तर त्याच्या गुणांच्या अनुरूप गुणग्राही जन त्याचा सन्मान करतात किंवा त्याच्या गुणांकडे लक्ष न गेल्याने त्यांना प्रसिद्धीपराङ्मुख रहावे लागते, असा आशय या श्लोकात कवीने व्यक्त केला आहे.

## आचरणात आणावे असे



ज्योतिर्मय साहित्य

भलेही स्वतःची प्रगती कमी झाली तरी चालेल, पण माझ्यामुळे कोणाचे नुकसान व्हायला नको ही भावना ज्या माणसाजवळ असते तोच माणूस योग्य अशा प्रगतीच्या वाटेवर असतो जिवनात जगतांना असे जगा की आपण कोणाची आठवण काढण्यापेक्षा आपली कोणीतरी आठवण काढली पाहीजे. जस कोणाचं सुख पाहून ते आपल्या वाट्याला का नाही म्हणून असमाधानी रहाण्यापेक्षा कोणाचं दुःख पाहून ते आपल्या वाट्याला नाही हे पाहून समाधानी राहण म्हणजेच सुखी जीवन होय.

आज सकाळी धुक्याने एक छान गोष्ट शिकवली की, जीवनात रस्ता दिसत नसेल तर दूरचं पाहण्याचा प्रयत्न करणं व्यर्थ असतं, एक एक पाऊल टाकत चला, रस्ता आपोआप मोकळा होत जाईल. म्हणून नेहमी मन निर्मळ ठेवा व प्रामाणिक रहा. कुणी किती ही फसवल तरी एक गोष्ट लक्षात ठेवा. प्रामाणिक माणसाच्या पाठीशी नेहमी सत्य उभं असत.तात्पर्य काय तर आपली सावली निर्माण करायची असेल तर ऊन झेलण्याची तयारी असावी लागते. यासाठी खिशात किती आहे हे महत्वाच नाही , आपण खुशीत किती आहोत हे महत्वाच आहे.



आरोग्य संजीवनी

## पित्ताशयात खडे का होतात? गालब्लेडर स्टोन

ज्योतिर्मय साहित्य

शरीरामध्ये उजव्या बाजूला यकृत असते. यकृताच्या खाली पित्ताची पिशवी असते. तिला पित्ताशय असे म्हणतात.

यकृतात तयार होणारे पित्त या पिशवीतून लहान आतड्यात येते. स्निग्ध पदार्थांचे पचन होण्यासाठी पित्त आवश्यक असते.

पित्ताशयात जंतूंमुळे दाह झाल्यावर बऱ्याचवेळा नंतर खडे तयार होतात. या खड्यांचे दोन प्रकार आहेत. कोलेस्टेरॉल ७० टक्क्यांच्या वर असलेले कोलेस्टरॉल खडे, हा पहिला व कोलेस्टेरॉल १० टक्क्यांहून कमी असलेले रंगद्रव्य खडे हा दुसरा प्रकार.

जंतूसंसर्गामुळे पित्ताशयात प्रथिनयुक्त पदार्थ तयार होतात (पेशी नष्ट झाल्यामुळे). या प्रथिनयुक्त पदार्थांच्या सहाय्याने मग इतर क्षार तेथे गोळा होतात व मग खडे तयार होतात.






विषमज्वर झालेल्या रुग्णामध्येही कालांतराने पित्ताशयात खडे तयार होतात. चाळीशी ओलांडलेल्या दोन-तीन मुले झालेल्या, लठ्ठ स्त्रीमध्ये पित्ताशयातील खडे होण्याचे प्रमाण जास्त असते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

पित्ताशयात खडे झाले, तरी कित्येक वेळा कोणतेही लक्षण निर्माण होत नाही. मात्र काही वेळा ताप, खूप जीवघेणी वेदना, हुडहुडी भरणे अशी लक्षणे दिसून येतात. वेदना खूपच तीव्र व असह्य अशी असते. त्यामुळे ताबडतोब तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. दवाखान्यात कळ थांबण्यासाठी मॉर्फीन किंवा पेंटोझोकेनचे इंजेक्शन देतात.

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

ती म्हणजे प्रत्यक्ष साहित्य, कला आणि विद्येची देवता सरस्वती असते. ती त्याला म्हणते, तुझ्यातील माणुसकी जागृत होते की नाही याची परीक्षा मी पाहिली. त्यासाठी मीच बालिकेचे रूप घेतले होते. तुझ्या पाषाणहृदयाला ज्या आर्त करुणेच्या स्वरांमुळे पाझर फुटला, त्याच तुझ्या हृदयातून आणि वाणीतून आता माणुसकीचे संगीत जन्म घेईल आणि लक्षावधी मनांना कोमल भावनांनी शुद्ध करेल. तुझी वाणी देशोदेशी चिरकाल घुमत राहील आणि त्यातून अनेक कवींना प्रेरणा मिळेल.

या नाटकात रवींद्रनाथांनी वाल्या कोळी लुटारूंपासून सरस्वतीला मुक्त करतो हे जे दाखवले आहे, प्रतीकात्मक आणि अतिशय महत्वाचे आहे. त्याचा अर्थ असा की सरस्वती आज साहित्यरूपाने लुटारुंच्या, धनदांडग्यांच्या ताब्यात आहे. तिला त्यांच्यापासून मुक्त केले पाहिजे. समाजाला बळ देणारे साहित्य आणि एकूणच साहित्य आणि कलाक्षेत्र हे साहित्यिक आणि कलावंतांच्याच ताब्यात असले पाहिजे. राजकारणी, धनदांडगे यांच्यापासून ते मुक्त असले पाहिजे. तरच ते सर्वसामान्यांना उपयुक्त ठरेल. समाजाच्या प्रगतीची दिशा त्यामुळे सापडू शकेल. साहित्यिकांना मोकळे आकाश मिळेल. रवींद्रनाथांनी त्याकाळी जे प्रतीकात्मक रूपाने सुचवले ते आजदेखील तेवढेच महत्वाचे आहे.


या नाटकाने रवींद्रनाथांनी जणू प्रायोगिक रंगभूमीची पायाभरणी केली. अनेक गोष्टी नवीन आणल्या. नाटकांवर इंग्रजी नाट्यभूमीचा प्रभाव होता, संगीताचा आणि रागदारीचा प्रभाव होता, त्या चौकटीतून नाटकाला बाहेर काढण्याचाच त्यांचा हा प्रयत्न होता. त्यांचे हे नाटक म्हणजे सुरांचा आणि स्वरांचा अविष्कार होता. त्याला एक प्रकारची आंतरिक लय होती. गाण्याच्या आणि रागदारीच्या बंधनांपासून काही अंशी मुक्त होत आपल्याला हवा तसा नाट्याविष्कार सादर करण्याचे आणि स्वरांच्या प्रकटीकरणाचे स्वातंत्र्य त्यांनी घेतले होते. ते नुकतेच इंग्लंडहून परतल्यामुळे या त्यांच्या प्रायोगिक नाटकावर काही अंशी पाश्चात्य संगीत आणि आयरिश संगीताचा प्रभावही होताच. हे नाटक केवळ वाचण्यासाठी नव्हेतच तर ते पाहावे आणि अनुभवावे अशा प्रकारचे होते. या नाटकाने वयाच्या केवळ विसाव्या वर्षी रवींद्रनाथांचे नाटककार म्हणून दमदार पदार्पण झाले. या नाटकातून साहित्यिक म्हणून आपल्या पुढील प्रवासाची दिशा रवींद्रनाथांना गवसली. आपले पुढील साहित्य कसे असेल याची जणू झलकच त्यांनी या नाटकाद्वारे दाखवली. दरोडेखोरांच्या किंवा धनदांडग्यांच्या तावडीतून सरस्वतीला मुक्त केल्याशिवाय कलावंताला सरस्वती प्रसन्न होत नाही हे त्यांना जाणवले होते. वाल्मीकींच्या अंतःकरणात जो दयेचा, करुणेचा झरा वाहू लागला, त्यामुळे जगाकडे आणि त्यातील क्रौर्याकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी वाल्मिकींना प्राप्त झाली. बालिकेला दरोडेखोरांच्या तावडीतून सोडवणे म्हणजेच सरस्वतीला नको असलेल्या व्यक्तींच्या ताब्यातून मुक्त करणे आवश्यक आहे हे त्यांच्या लक्षात आले. वाल्मिकी प्रतिभा हे नावच खरोखर अगदी सुंदर आहे. त्याच्या नावातच रवींद्रनाथ यांच्या प्रतिभेचाही विलास आपल्याला दिसतो. त्यांच्या प्रतिभेची झेप आपल्याला दिसते. या नाटकात वाल्मिकींची भूमिका स्वतः रवींद्रनाथांनी केली तर सरस्वतीची भूमिका त्यांची एक भाची प्रतिभा म्हणून होती तिने केली. त्या काळात नाटकात किंवा रंगभूमीवर आपल्या घरातील मुलींना सनातनी विचारांचे लोक पाऊल ठेवू देत नसत. असे करणे म्हणजे प्रतिष्ठेला बाधा आणण्यासारखे होते. पण रवींद्रनाथांनी ही सुरुवात स्वतःच्या घरापासूनच केली. ही एक प्रकारची सामाजिक क्रांतीच होती. त्याची किंमतही टागोर कुटुंबीयांना मोजावी लागली पण त्याची त्यांना पर्वा नव्हती. स्त्रियांना देखील कला, साहित्य, शिक्षण इ. क्षेत्रात मुक्त आकाश मिळाले पाहिजे असेच त्यांना वाटत होते. या नाटकात खरं तर त्यांच्या घरातील बहुतेक सदस्यांचा या ना त्या कारणाने सहभाग होता. हे नाटक पहिल्यांदा सादर झाले ते सुद्धा टागोर कुटुंबियांच्या जोराशंको वाडी इथेच ! कला, साहित्य इ प्रांतात पुढील काळात रवींद्रनाथांची जी वाटचाल होणार होती, त्याची सुरुवात आणि दिशादर्शन करणारे नाटक म्हणजे वाल्मिकी प्रतिभा !


# शा क म - एक आठवणींचा कॅनवास

ज्योतिर्मय साहित्य

मित्र, मैत्रिणींनो, आमच्यासाठी शा.क.म. ही नुसतीच वास्तु नाहीये... ती एक दुवा आहे आम्हा शा.क.म.र्सना जोडणारा ! आमच्या रंध्रात सळसळणारं एक चैतन्य आहे ते ! आम्हा मित्र मैत्रिणींना स्नेह अन जिव्हाळ्याच्या बंधनात बांधून ठेवणारी एक रेशीम डोर आहे ती ! मित्रांनो, कालचा दिवस नक्कीच काही खास होता असं म्हटलं तर वावगं ठरू नये ! माहित नाही काय पण; अब्दुल गफ्फार सरांचं मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीला चित्र प्रदर्शन आहे आपल्या ग्रुपवरील पोष्टने ही माहिती झाल्यापासून ते प्रदर्शन पाहण्यासाठी मन जणू उत्सुक झालं होतं. खरं तर, अब्दुल गफ्फार सरांचा आणि माझा वैयक्तिक असा परिचय सुद्धा नव्हता, आणि शा.क.म.ला मी होतो ती वर्षे होती १९७८ ते जून १९८३ साल ! आणि अब्दुल गफ्फार हे १९८६ ते १९९० या काळात शा.क.म.ला होते. कालपर्यंत प्रत्यक्षात आम्ही एकमेकांना कधी पाहिलंही नव्हतं... हां, एक समान धागा मात्र आम्हा दोघात होता...शा.क.म. स्नेहाचा, त्या अवीट वास्तुवरील प्रेमाचा !

काल दुपारी आम्ही सहा शा.क.म.र्सनी - तुकाराम कर्वे, मी स्वतः मनोहर मंडवाले, अशोक चौडेकर, बाळासाहेब दुबे, औदुंबर, सीमाब अन्सारी... आम्ही सगळ्यांनी जसा जहांगीरच्या कलादालनात प्रवेश केला, तसं अब्दुल गफ्फार यांनी मलाही लांबूनच ओळखलं आणि, अरे, मनोहर भाई... क्या बात हैं! अच्छा लगा आप भी आये, आपकी हर पोष्ट मैं पढ़ता हूँ! आणि मग एकेक करुन आम्हां सर्वांना त्यांनी अशी काही मिठी मारली की, ते जणू आमच्या बालपणीचे जीवलग मित्रच आहे! कालच्या त्या




भेटीत त्यांच्या डोळ्यांत आनंदाचे मोर पहिले मी नाचणारे ! त्याच्या त्या गळाभेटीत तर शा.क.म.ची आपली ती वास्तुच भेटल्याचा भास मला झाला. कित्ती कमाल आहे नं, ज्या व्यक्तीला मी कधी पाहिलंही नव्हतं, ज्याला आधी कधी भेटलोही नव्हतो, त्या व्यक्तीच्या मनात माझ्याबद्दल एवढा स्नेह ? सरांचं चित्र प्रदर्शन पहिल्याच्या लक्षात आलं, आपलेपणाने माणसं जोडण्याची कला त्यांच्या त्या पैंटिंग मध्येसुद्धा आहे. जरा वेळाने; संजय सुरवाडे आला, मुख्तार शेखचीही भेट झाली! एवढे सर्व भेटल्यावर शा.क.म.तल्या जुन्या आठवणींची कवाडं तर उघडलीच त्या कवाडांवरली धूळही मग झटकली गेली. मन पुन्हा फिरून आलं शा.क.म.च्या त्या राजस वाटांवरुन ! ज्या वाटांनी आम्हाला आमचं डेस्टिनेशनचं दिलं नाही तर त्या डेस्टिनेशनपर्यंत पोहचताना होणारा प्रवास सुखद कसा करायचा याचं कसबही आमच्या झोळीत टाकलं! डोळ्यांसमोर ती वास्तु मग किती वेळ फेर धरून होती, एकेका आठवणींचे झोके नजरेसमोर हिंदकळत होते आणि झोक्यापरत काळ पुढे सरकत होता. निघतानाही, पुन्हा गळाभेटी झाल्या, टाटा ; बाय बाय झालं! मित्रांनो, जनाना महलच्या त्या वास्तुने एक दृढ नातं आम्हां सर्वांमध्ये निर्माण केलंय आणि तेच वाहतंय आमच्या धमन्या धमन्यांतून... एक बहरतं चैतन्य होऊन ! त्याचा तो सळसळता प्रवाह असाच नित्य वाहात राहो... बस्स; वाहात राहो !

मनोहर मंडवाले
कल्याण
मो. ८८७९१२३२३६

****




## ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे रंजना सानप याच्या कवितेचे सादरीकरण

ज्योतिर्मय साहित्य

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे नुकतेच पार पडले. या संमेलनात कवी कट्ट्यावर रंजना सानप यांच्या ''मी कुणबीची धनीन'' कवितेचे सादरीकरण झाले. कवितेने उपस्थितांकडून वाहवा मिळवली. त्यांच्या कविता सादरीकरणाबद्दल डी वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ.पी डी पाटील, प्राध्यापक उषा तांबे, कवी कट्टा प्रमुख राजन लाखे, समन्वयक गोपाळ कांबळे यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन रंजना सानप यांचा गौरव करण्यात आला.

रंजना सानप या साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव असे कार्य करत आहे. आतापर्यंत ९६ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन वर्धा व अनेक ठिकाणी कवी संमेलनात निमंत्रित कवी म्हणून सहभाग नोंदवला आहे. अनेक ठिकाणी त्या व्याख्याने व कथाकथन करत असतात. वर्तमानपत्रे दिवाळी अंक व शासकीय स्तरावर ही त्यांच्या लेखनाची नोंद घेण्यात आली आहे. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. या त्यांच्या कार्याबद्दल विविध स्तरातून त्यांच्यावर कौतुक व अभिनंदनच वर्षाव होत आहे.






# सांजवातीची चाहूल सांगणारी संगीता वाणी यांची कविता

ज्योतिर्मय साहित्य

सांजवेळ ही गृहिणीच्या नजरेतून बघावी लागते. कधी ती तिन्ही सांजा झाल्यावर देवघरातील, आंगणातील तुळशी वृंदावनीचा दिवा लावताना दिसेल तर कधी तिच्या हृदयात तिच्या कान्हाची ज्योत तेवताना दिसेल. महाराष्ट्रातच नाही तर भारताच्या बहुतांश खेड्यात सांजवात लावण्याची प्रथा आहे. अंधारावर प्रकाशच मात करु शकतो म्हणून ती दिपकळीका वार्याचा धक्का लागू नये म्हणून सावरते.''जैसी दीपकळिका धाकुटी। परी बहु तेजाते प्रकटी। तैसी सद्बुद्धि हे थेकुटी। म्हणो नये।।''(ज्ञानेश्वरी) तशी ही दीपकळिका लहानच पण प्रकाशही खुप देते. जीवनातील अंधार घालवते. संगीता वाणी ही कवयित्री जेव्हा तिन्ही सांजेला दिवा लावतानाचे रुपक निवडते तेव्हा या कवयित्रीच्या मनात आपल्या प्रेयसाबद्दल केवळ प्रेमच नाही तर ती या ज्योतीच्या माध्यमातून हृदयातील ज्ञानज्योत ,प्रेमज्योत उजळण्याची भाषा करते तेव्हा कवयित्रीच्या गहन व चिंतनातील विचारशक्तीची चमच दिसते.प्रियाराधनाच्या आगमनाची सांजवात ही चाहूल असते. कवयित्री तुळशीच्या



वृंदावनाचेच रुपक का निवडते?परंपरा म्हणून की अन्य कारण?मघाशी म्हटल्याप्रमाणे संगीता वाणी कवितेतून बोलताना कधीच एका पातळीवरुन व्यक्त होत नाहीत. त्यांच्या बोलण्याला अनेक पदर असतात.इथे तुळशीचेच रुपक कवयित्री का निवडते?तर वृंदेला लबाडीने विष्णूने फसवले व तिचा भोग घेतला.मात्र वृंदेचे पतीवरील प्रेम कणभरही कमी झाले नाही.तिने तिथेच स्वतःला संपविले. ही पुराणकथा नजरेसमोर ठेऊन कवयित्री म्हणते,

वृंदावनी
तुळशीच्या
पाजळते
सांजवात
उजळते
प्रेमज्योत
हृदयाच्या
मंदिरात
याठिकाणी

पाजळणे हा शब्द महत्वाचा आहे. ज्योतीने ज्योत पेटविणे अर्थात पाजळणे ! आपल्या हृदय मंदीराला प्रेमज्योतीने प्रकाशमान करणे किती ही रम्य कल्पना !अनेकांच्या हृदयात कचरा साचून त्याचा उकीरडा झालेला असतो.मात्र कवयित्रीचे हृदय हे मंदिरा इतके पवित्र आणि शुध्द आहे म्हणून ती हृदयमंदीर हा शब्द वापरते. जनाबाईने हृदय बंदीखाना केला।आत विठ्ठल कोंडीला।। कारण तिचे हृदय हे मंदीर होते.एक गौळण कृष्णाला विनविते, हरी तुम्ही हृदय मंदिरी कधी याल हो!

कवयित्रीला निसर्गात सुध्दा बालकवींसारखे मानुषरुपात दर्शन होते. फुलराणी कवितेत बालकवी सूर्योदयाच्या रम्य क्षणांवेळी येणार्या प्रकाश किरणांचे अन् नवीन उमलत्या कळीचे लग्न लावतात. त्यातून फुलराणी सारखे काव्य जन्माला येते.

तसाच भाव त्याच उत्तर महाराष्ट्रातल्या भूमीतील कवयित्री संगीता वाणी व्यक्त करताना म्हणते की,

मावळतीला क्षितीजावर
खुलतो लाल केशरी रंग
मिलन होते क्षणभराचेच
सांजेला दिनकराशी होतो संग!

कवयित्रीने बालकवींची कविता वाचलेली नाही तरीही संध्याकाळी पृथ्वी आणि सूर्य यांच्या मिलनाची रम्य कल्पना सहजतेने मांडून जाते. कवयित्री वाणींनी पृथ्वीचे प्रेमगीत कविता वाचलेली नाही, त्यांना ठाऊकही नाही तरी पण हा रम्य सोहळा त्यांनी चारच ओळीत अगदी संवेदनशीलतेने व आशयपूर्णतेने जो रेखाटलाय तो अव्दितीय आहे.

हळूहळू ती सांजवेळ,
मदमस्त झाली होती...
क्षितीजावरची लाली,
तिच्या देहांगी आली होती
प्रियकराच्या आकंठ प्रेमात डुंबुन
गेलेली प्रेयसी जशी
मदमस्त होते, त्या
प्रणयक्रिडेचा आनंद
तिच्या ओठांवर,
गालावर लाली
आणतो, अंग शहारुन
जातं. हाच

सचेतनाचा मानुषी भाव कवयित्री निसर्गावर आरोपित करते तेव्हा सहजपणे चेतनागुणोक्ती अलंकार अविष्कृत होतो.संगीता वाणी यांच्या कवितेत विविध वृत्तं दिसणार नाहीत, पण अलंकार योजना करायला त्या माहिर आहेत हे त्यांच्या कवितेचे वेगळपण आहे.

सांज फुलणे हे गावखेड्यातील लोकांना अधिक कळते.रोजची सांज होणे आणि सांज फुलणे यात खूप अंतर आहे.सांज फुलल्यानंतर तिला जो लाल केशरी रंग प्राप्त झालाय, त्यात वाणींना पृथ्वीचे आणि दिनकराचे अर्थात सूर्याचे मिलन दिसते. क्षणाचेच मिलन असले तरी त्या स्वर्गसुखाची तुलना होऊच शकत नाही हा मानुषी भाव कवयित्री निसर्गात पाहते .

आयुष्य म्हणजे सीख दुःख आलीच. कधी आनंदाचे क्षण तर कधी दुःखाचे क्षण !कवयित्रीने संत सावता माळी यांचा ''समयासी सादर व्हावे। देव ठेवील तैसे रहावे।।

कोणे दिवशी पालखी सुभेदार। कोणे दिवशी पायाचा चाकर। चालत रहावे। समयासी सादर व्हावे।।''

हाच भाव कवयित्री ऋतूंचे रुपक वापरुन व्यक्त करते.पानगळ संपली की वसंत येणारच हा वाणींचा सकारात्मक भाव, आशावादीपणे जीवनाकडे पाहण्याची दृष्टी दाखवतो.

थांबून पानगळ शिशिराची
येईल वसंत बहरुन
होऊन निवांत तुही
बघशील ऋतू बदलून!

हा उच्च कोटीचा भाव फक्त संगीता वाणी हीच कवयित्री व्यक्त करु शकते.

प्रा.डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे
प्रमुख,
मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र,
विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

# मातृभाषेतून शिक्षण ही काळाची गरज

**ज्योतिर्मय साहित्य**

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने




मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही.


श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस, आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

# सौ बार....

**ज्योतिर्मय साहित्य**

रविवारची रंगोली मी आवर्जून पाहत असतो. कालच्या रविवारच्या रंगोली मध्ये संगीतकार रवी यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांची गाणी दाखवली होती. एकाहून एक सुंदर गाणी ! सर्वच गाणी आवडीची असली तरी त्यातले एक गाणे माझ्या विशेष आवडीचे होते, सौ बार जनम लेंगे ! रफींच्या मधाळ स्वरातले हे गाणे मला विलक्षण आवडत आले आहे . रफींचा सूर नेहमीच चांगला लागत असला तरी या गाण्यात त्यांच्या स्वरांच्या मधून अक्षरश : मध पाझरत असल्याचं जाणवतं. इतकेच नव्हे तर गाण्यातल्या शब्दांना त्यांनी जो अर्थपूर्ण न्याय दिला आहे , त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे ! मला जी गाणी आवडतात ती मला गायला आवडतात. त्या प्रमाणे मी माझ्या जड आवाजात गाऊन इथेच टाकले आहे ! पण हा लेख आणि गाणे एकत्र न टाकता येणे हा माझा अडाणीपणा ! हे मी कितव्यांदा तरी लिहितो आहे .

मंगेश उदगीरकर

उस्तादोंके उस्ताद १९६३ या चित्रपटातले हे गाणे थोडे भूतकाळाकडे नेणारे आहे ! म्हणजे माझ्यातरी ! गीतकार आहेत असद भोपाली, संगीतकार – रवी . कधीकाळी कुठेतरी जीव गुंतलेल्या आठवणींना जागे करणारे हे गाणे आहे. आजच्या आपल्या संथ चाललेल्या जीवनात एखादा खडा टाकून तरंग उठवून जाणारे ! व्याकुळ करून जाणारे .

सौ बार जनम लेंगे, सौ बार फना होंगे
ऐ जाने वफा फिर भी हम तुम ना जुदा होंगे
किस्मत हमे मिलनेसे रोकेगी भला कब तक
इन प्यार की राहोमे भटकेगी वफा कबतक
कदमोके निशां खुदही मंझीलका पता होंगे

काय दुर्दम्य आशावाद आहे पहा ! आयुष्याच्या या टप्प्यावर ती कुठे आहे माहित नाही ! हा कुठे आहे देव जाणे, पण तरीही कुठेतरी, केंव्हातरी भेट होणारच या भावनेने पछाडलेला हा , कुठेतरी एखाद्या गलितगात्र झालेल्या मनात स्फुल्लिंग चेतवून जातो !

ये कैसी उदासी है, जो हुसन पे छाई है
हम दूर नही तुमसे , केहने को जुदाई है
अरमान भरे दो दिल, फिर एक जगह होंगे ....

या गाण्यात रफीसाहेबांचा आवाज विशेष लागलाय ! असं वाटतं



राहतं कि, त्यांचाही जीव कुठेतरी ....... असो !


# श्रद्धांजली – पद्माकर शिवलकर

**ज्योतिर्मय साहित्य**

क्षमता असूनही कसोटी सामना खेळण्याची संधी न मिळालेले फिरकी गोलंदाज पद्माकर शिवलकर यांचे आज निधन झाल्याची बातमी आताच वाचनात आली. (त्यांच्या बरोबरीने मुंबईकडून खेळणारे मिलिंद रेगे यांचे अलीकडेच निधन झाले.) १२४ प्रथमश्रेणी सामन्यात ५८९ बळी हा शिवलकर यांच्या क्षमतेचा आणि सातत्याचा पुरावा.. त्यांना भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविले होते. त्यांच्या संदर्भात येथे १३ मार्च २०१७ रोजी लिहिलेला हा मजकूर...

**शिवलकर आणि संधी :**

पद्‌माकर शिवलकर हे नाव आजच्या पिढीला माहित असण्याचे कारण नाही. मात्र आज हयात असणार्या दोन पिढ्यांना हे नाव आणि ते धारण करणार्या व्यक्तीचे कर्तृत्व माहित आहे. ते त्यांच्या काळातील प्रभावी फिरकी गोलंदाज. डावखुरे लेगस्पीनर. मुंबईकडून खेळायचे. मात्र देशांतर्गत प्रथमश्रेणी सामन्यांत सतत उत्तम कामगिरी नोंदवणार्या या गोलंदाजाला आपल्या देशाच्या संघात कधीही स्थान मिळाले नाही.




राधाकृष्ण मुळी,
छत्रपती संभाजीनगर

कारण तो जमाना बिशन बेदीचा होता. आज हे सगळे लिहिले आहे, ते ख्यातनाम संशोधक आणि लेखक रामचंद्र गुहा यांनी. त्यांचा लेख वाचताना जुन्या जमान्यातील रणजी, दुलीप आणि इराणी चषक सामन्यांची आणि त्या काळी रेडीओवरुन ऐकलेल्या ‘‘ धावत्या वर्णना ‘‘ ची आठवण येणे अगदी स्वाभाविक होते. त्या धावत्या वर्णनातून कानी पडलेली अनेक नावं आठवली. साळगावकर, सदानंद मोहोळ, विठ्ठल जोशी, मधू गुपते, अब्दुल इस्माईल, पारकर, सुधीर नाईक, अजित पै, जयंतीलाल, मधू रेगे इ.इ. कांहींना संधी मिळाली. काही मावळले.

मात्र सातत्य असूनही देशाकडून खेळायची संधी मिळू न शकलेल्या शिवलकरांची हकीकत संधीच मोठेपण अधोरेखित करते...

....आणि अशी संधी न मिळालेली त्यांच्यासारखी माणसं कामगिरीसह इतिहासकाराच्या लक्षात राहतात हा दिलासाही देते....!




# अशी झाली गम्मत

**ज्योतिर्मय साहित्य**

एप्रिल २००६ मध्ये स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या सेवेतून मी स्वेच्छानिवृत्ती घेतल्यापासून म्हणजेच मी माझा चहा स्वतःच करून घेतो आणि चहा पिणे झाल्यावर माझी कपबशी धुवून जागच्या जागी ठेवून देतो. माझी सौ. कधीच चहा घेत नसल्यामुळे मी तिला माझ्यासाठी चहा करण्याचा किंवा माझी कपबशी धुण्याचा त्रास देत नाही.

मी चहाचा शौकीन असल्यामुळे मला वेगवेगळ्या ब्रँडची चहापूड तसेच निरनिराळे चहाचे मसाले माझ्या चहामध्ये वापरायला आवडतात.

तर एकदा काय झालं, घराजवळच असलेल्या किराणा दुकानामधून अनेक वस्तूंसोबत नामांकित कंपनीच्या चहाच्या मसाल्याचे एक पॅकेट आणि सौ. च्या सांगण्यावरून त्याच कंपनीचे सांबार मसाल्याचे एक पॅकेट विकत घेतले. चहाच्या मसाल्याचे पॅकेट निळ्या रंगाचे तर सांबार मसाल्याचे पॅकेट जांभळ्या रंगाचे होते. प्रत्येक पॅकेट पन्नास ग्रामचे होते. घरी आल्यावर सर्व वस्तू योग्य जागी ठेवून ही दोन्ही पॅकेट्स किचनमध्ये रॅकवर पटकन नजरेस पडतील अशा ठिकाणी ठेवून दिली.

त्याच दिवशी नेहमीप्रमाणे दुपारी बरोबर चार वाजता माझा दुपारचा चहा करण्यासाठी मी किचनमध्ये आलो. सौ. सुद्धा सहज गप्पा मारण्यासाठी तिथे येऊन बसली. मी चहाच्या पातेल्यात कपभर दूध टाकून त्यात साखर आणि चहाची पूड टाकली आणि पातेले गॅसवर ठेवले. पहिला चहाचा मसाला संपलेला होता म्हणून मी नवीन पॅक फोडला. आवश्यक तेवढा चहाचा मसाला हातावर घेतला. तर लगेच सौ. म्हणाली, ‘‘आज या चहाच्या मसाल्याचा रंग लाल का बर दिसतो? नेहमी तर रंग वेगळा असतो.‘‘

मी तिला म्हणालो, ‘‘प्रत्येक कंपनी आपल्या मालाचा खप वाढावा म्हणून आपल्या उत्पादनात वेळोवेळी सुधारणा करीत असते. हा त्यांचा धोरणात्मक निर्णय असतो. त्यामुळेच आज चहाच्या मसाल्याचा रंग बदललेला दिसतोय.. त्यात काय एवढे?‘‘


उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर
मोबाईल–८८८८९२५४८८

तर ती म्हणाली, ‘‘तेही खरंच आहे.‘‘

चहाचा मसाला चहामध्ये टाकल्यावर आणि चहा उकळल्यावर मी कपावर गाळणी ठेवून चहा कपात ओतला.

कपातून थोडा चहा बशीत ओतल्यावर त्या चहाचा रंग थोडा लालसर वाटला ; बशी तोंडाला लावली आणि एक घोट घेतला तर चहाला चक्क सांबारची चव आली होती. मी तोंड कसनुसे केले.

मग मी किचनमधील रॅककडे पाहिले तर चहाच्या मसाल्याचे पॅकेट तिथेच होते आणि मी हातात घेतले ते सांबारचे पॅकेट होते, हे माझ्या लक्षात आले आणि सौ. च्या सुद्धा लक्षात आलेले दिसले.. मी सौ. कडे बघितले तर ती गालातल्या गालात हसत मला म्हणाली, ‘‘तुम्ही नेहमीच चहाचे निरनिराळे मसाले वापरता ना! मग आज हा सांबार चहा प्या !!‘‘

तर अशी झाली माझ्या चहाची गम्मत.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559